# उपराजधानीत होणार 'अ‍ॅग्री कन्व्हेंशन सेंटर'

## ■ केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची माहिती ■ शेतकऱ्यासाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा, परिसंवाद

लोकशाही वार्ता/नागपूर

शेतकऱ्यांना शेतीबद्दल तांत्रिक मार्गदर्शन मिळावे व त्यांच्या शेतमालाचे योग्य विपणन होण्याच्या दृष्टीने अ‍ॅग्री कन्व्हेंशन सेंटरची स्थापना नागपूरमध्ये करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. यासंदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून नागपुरात अमरावती रोडजवळ वायुसेनानगरालगत कृषी विभागाच्या ४३ एकर जागेची पाहणी करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री आणि केंद्रीय जलसंपदामंत्री नितीन गड[illegible]ांनी शनिवारी दिली.

या सेंटरमध्ये एकाच छताखाली शेतकऱ्यासाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा, परिसंवाद घेण्यासाठी जागा तसेच शेतकऱ्यांचा शेतमाल, प्रक्रियायुक्त कृषी उत्पादने यांचे प्रदर्शन करणारी दालने कायमस्वरूपी असतील. केंद्राच्या उर्वरित जागेत शेतीची प्रात्यक्षिके घेण्यासाठीही जागा उपलब्ध राहणार असून हे केंद्र 'बांधा, वापरा, हस्तांतरित करा' (बी.ओ.टी.) या तत्त्वावर बांधले जाणार आहे. विदर्भातील शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी नागपूरमध्ये आयोजित अ‍ॅग्रोव्हिजन - २०१८ कृषिप्रदर्शनाबद्दल माहिती गडकरी यांनी पत्रपरिषदेत दिली. याप्रसंगी रामटेकचे खासदार कृपाल तुमाने, आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, जिल्हा परिषद अध्यक्ष निशा सावरकर, अ‍ॅग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, आयोजन समितीचे सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर, माजी आमदार आशीष जयस्वाल होते.



- २३ ते २६ नोव्हेंबरदरम्यान चार दिवस चालणाऱ्या कृषिज्ञान तंत्रज्ञान प्रसार व परिवर्तनाच्या या महोत्सवात देशाच्या सर्व भागातून शेतकरी सहभागी होतात. वर्षागणिक अ‍ॅग्रोव्हिजनचा आकार व त्याचा शेतकरी आणि संलग्न घटकांच्या जीवनातील प्रभाव वाढत असून अल्पावधीतच ते भारतातील कृषी तंत्रज्ञान प्रसाराचा सर्वात मोठा महोत्सव होण्याच्या दिशेने आश्वासक वाटचाल करत आहे. अ‍ॅग्रोव्हिजन फाऊंडेशन, एम.एम.अ‍ॅक्टीव सायन्स टेक कम्यूनिकेशन, पूर्ती उद्योग समूह, विदर्भ आर्थिक विकास परिषद (वेद) व महाराष्ट्र आर्थिक विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केल्या जाणाऱ्या अ‍ॅग्रोव्हिजनमध्ये विविध कार्यशाळा, प्रदर्शने, परिसंवाद आयोजित केले जातात. गत वर्षाप्रमाणे यावर्षीसुद्धा भव्य पशुप्रदर्शन भरविण्यात येणार आहे. कपाशी उत्पादन, जवस उत्पादन, जैविक शेती, शेळी मेंढी पालन व निर्यात संधी, रेशीम उत्पादन, मधुमक्षिका पालन, सूक्ष्म सिंचन, हरितगृह तंत्रज्ञान, कृषी वित्तपुरवठा, निसर्ग शेती, भाजीपाला उत्पादन, डिजिटल पेमेंट जागृती या विषयावर प्रदर्शनात कार्यशाळा सबंधित क्षेत्रातील यशस्वी शेतकरी व कृषी शास्त्रज्ञ यांच्यामार्फत घेण्यात येतील. फुलशेती, हळद-आले लागवड, संत्रा प्रकिया, सेंद्रिय शेती, मत्स्यपालन, कुक्कुटपालन यावर विस्तृत कार्यशाळा होतील. याशिवाय, दुग्धव्यवसाय, बांबू लागवड -व्यापार संधी, उस उत्पादन यावर एकदिवसीय परिषदाचेही आयोजन करण्यात येईल, अशी माहिती गडकरी यांनी दिली.

### भव्य पशुधन दालन

खास पशुप्रेमी शेतकऱ्यांसाठी अ‍ॅग्रोव्हिजनमध्ये स्वतंत्र पशुधन दालन उभारण्यात येते. देशभरातील गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या आदी विविध प्रकारचे जातीवंत, गुणवंत, कीर्तिवंत पशुधनाचा यात सहभाग होता. गेल्या वर्षी नवव्या अ‍ॅग्रोव्हिजनमध्ये प्रथमच आयोजित केलेल्या या पशुप्रदर्शनास शेतकऱ्यांनी उदंड प्रतिसाद दिला. या पार्श्वभूमीवर यंदा दहाव्या अ‍ॅग्रोव्हिजनमध्येही पशुप्रदर्शनाचे स्वतंत्र दालन उभारण्यात येणार आहे.

### अ‍ॅग्रोव्हिजन पुरस्कार देणार

अ‍ॅग्रोव्हिजन दशकपूर्तीच्या निमित्ताने गेल्या १० वर्षात विदर्भात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या यशस्वी शेतकऱ्यांचा 'अ‍ॅग्रोव्हिजन पुरस्कार -२०१८' हा पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात येईल. या पुरस्कारांच्या श्रेणीत फलोत्पादन, कृषिपूरक व्यवसाय, यशस्वी कोरडवाहू शेती, दुग्धोत्पादन,जलसंधारण यांचा समावेश असणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी आपला प्रस्ताव तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रासह पाठवावेत. पत्ता - अ‍ॅग्रोव्हिजन फाऊंडेशन ४०२, गोविंद अपार्टमेंट, पोस्ट ऑफिसच्या मागे, शंकरनगर नागपूर.